# प्रेसनोट दि. ०१/१२/२०२०

## पिंपरी-चिंचवड, गुन्हे शाखा युनिट- ४ कडुन घरफोड्या करणाऱ्या कुख्यात सी. एम. च्या टोळीस अटक

## घरफोडीचे ०९ गुन्हे उघड व १९,६५,०००/- रु. किं. चा मुद्देमाल जप्त

मा. कृष्ण प्रकाश सो, पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड यांनी पिंपरी चिंचवड परिसरात घडणारे घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणुन प्रतिबंध करण्याचे आदेश दिल्याने मा. सुधीर हिरेमठ सो, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे शाखा यांनी गुन्हे शाखेचे सर्व अधिकारी व अंमलदार यांना रेकॉर्ड वरील घरफोडी करणाऱ्या गुन्हेगारांच्या हालचालीवर बारीक लक्ष ठेवुन घरफोडीचे गुन्हे उघडकिस आणण्याचे आदेशित केले होते.

या अनुशंगाने गुन्हे शाखा युनिट-४ चे वरिष्ठ पोलीस निरिक्षक प्रसाद गोकुळे यांचे मार्गदर्शनाखाली रेकॉर्ड वरील गुन्हेगारांची तपासणी करत असताना पोहवा/२५० नारायण जाधव व पोना/११४२ लक्ष्मण आढारी यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, पिंपरी-चिंचवड व पुणे शहर आयुक्तालयाचे रेकॉर्डवरील तडीपार असलेला सराईत घरफोडया करणारा आरोपी नामे चंद्रकांत ऊर्फ सी. एम अनंत माने, वय-२७ वर्षे, रा- मोरया हौसिंग सोसायटी, बिल्डिंग नंबर- ०५, रुम नंबर-६१०, वेताळ नगर, चिंचवड, पुणे याने त्याचे इतर साथिदारासह मागील २ ते ३ महिन्यात पिंपरी चिंचवड परिसरात घरफोडीचे अनेक गुन्हे केले आहेत व तो सद्या उस्मानाबाद जिल्हयात लपवुन बसलेला आहे. सदर बातमीच्या अनुशंगाने गुन्हे शाखा युनिट-४ चे अधिकारी व अंमलदार यांनी सलग ०३ दिवस उस्मानाबाद जिल्हयात तळ ठोकुन ग्राम- वाघोली गौर, ता- कळंब, जि-उस्मानाबाद येथुन सी.एम. टोळीच्या खालील सदस्यांना ताब्यात घेतले.

१) चंद्रकांत ऊर्फ सी. एम अनंत माने, वय-२७ वर्षे, रा- मोरया हौसिंग सोसायटी, वेताळ नगर, चिंचवड, पुणे
२) राजु शंभु देवनाथ ऊर्फ राजु बंगाली, वय- २० वर्षे रा- वेताळ नगर, चिंचवड, पुणे,
३) राम ऊर्फ रामजाने लक्ष्मण क्षिरसागर, वय- २६ वर्षे रा- मु.पो. वाघोली गौर, ता- कळंब, जि-उस्मानाबाद ,
४) अमोल ऊर्फ भेळया अरुण माळी, ऊर्फ घुगे वय- २७ वर्षे रा- चिंचवडेनगर, चिंचवड, पुणे.

सदर आरोपींना अटक करुन त्यांचेकडे कसोशिने तपास केला असता सदर टोळीने मागिल २ ते ३ महिन्यांचे कालावधीत पिंपरी चिंचवड व पुणे शहर परिसरात घरफोडीचे ०९ गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यांचेकडुन त्यांनी केलेल्या घरफोडीच्या गुन्ह्यांतील चोरीस गेलेले ३८१ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, ०१ किलो वजनाचे चांदीचे दागिने, घरफोडीचे साहित्य असा एकुण १९,६५,०००/- रु कि चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे तर त्याने ज्या सोनारास ०५,५०,०००/- रु.किं चे १०९ ग्रॅम वजनाचे सोने विक्री केले आहे त्याचा शोध सुरु आहे.

सदर आरोपीकडुन खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आले आहेत.

१) चिंचवड पोलीस स्टेशन गु.र.नं.२४८/२०२० भा.दं.वि.क.४५४,३८०
२) चिंचवड पोलीस स्टेशन गु.र.नं.२९६/२०२० भा.दं.वि.क.४५४,४५७,३८०
३) निगडी पोलीस स्टेशन गु.र.नं.३७६/२०२० भा.दं.वि.क.४५४,३८०
४) निगडी पोलीस स्टेशन गु.र.नं.३८६/२०२० भा.दं.वि.क.४५४,३८०
५) निगडी पोलीस स्टेशन गु.र.नं. ९४/२०२० भा.दं.वि.क.४५४,४५७,३८०
६) निगडी पोलीस स्टेशन गु.र.नं. ३९१/२०२० भा.दं.वि.क.४५७,३८०
७) देहुरोड पोलीस स्टेशन गु.र.नं.७७१/२०२० भा.दं.वि.क.४५४,३८०
८) देहुरोड पोलीस स्टेशन गु.र.नं. ६७३/२०२० भा.दं.वि.क.४५४,३८०
९) विश्रामबाग पोलीस स्टेशन पुणे शहर गु.र.नं. ६६५/२०२० भा.दं.वि.क.४५४,३८०

सदरचे ४ ही आरोपी हे घरफोडी करणारे सराईत गुन्हेगार असुन त्याचेवर पिंपरी-चिंचवड, पुणे शहर व पुणे ग्रामीण हद्दित यापुर्वी अनुक्रमे- ४५, १८, ०६, १० असे एकुण ७६ गुन्हे दाखल आहेत. तसेच यापुर्वी टोळीचा म्होरक्या चंद्रकांत ऊर्फ सी.एम माने यास पोलीस उप-आयुक्त, परि-१, पिंपरी चिंचवड यांनी जानेवारी २०१९ पासुन ०२ वर्षो साठी तडीपार केले आहे.

सदर आरोपी हे दुपारच्या वेळी आरोपी क्र ४ याचे ऑटो रिक्षाने फिरुन वॉचमन व सी.सी.टी.व्ही नसलेल्या सोसायटी हेरत असे. त्यानंतर आरोपी क्र १ व २ हे सोसायटी मध्ये प्रवेश करुन लॉक असलेल्या फ्लॅटचा कडी कोयंडा कटावनी व हातोडयाने उचकटुन व लॉक तोडुन घरात प्रवेश करत असे तर अ. क्र ३ व ४ हे रस्त्यावर पहारा देत असे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. कृष्ण प्रकाश सो, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. रामनाथ पोकळे सो, पोलीस उप आयुक्त गुन्हे मा. श्री सुधीर हिरेमठ सो, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, मा. श्री. राजाराम पाटील सो, यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा, युनिट-४ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रसाद गोकुळे, सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, सहा.पो.उप.नि. धर्मराज आवटे, पोहवा/ प्रविण दळे, नारायण जाधव, संजय गवारे, दादाभाऊ पवार, अदिनाथ मिसाळ पोना/ संतोष असवले, तुषार शेटे, लक्ष्मण आढारी, मो. गौस नदाफ, वासुदेव मुंडे पोशि/ शावरसिध्द पांढरे, प्रशांत सैद, सुनिल गुट्टे, तुषार काळे, सुरेश जायभाये, धनाजी शिंदे, आजिनाथ ओंबासे, सुखदेव गावंडे, गोंविद चव्हाण, तसेच तांत्रिक विश्लेषन विभाग गुन्हे शाखेचे नागेश माळी, राजेंद्र शेटे, यांनी केली आहे.

